# उच्च शिक्षणातील संशोधन पध्दती

संपादक

डॉ. नविन केशव सोळंके

**ISBN : 978-81-945997-8-4**

- **उच्च शिक्षणातील संशोधन पध्दती**

**डॉ. नवीन केशव सोळंके**

**© सुरक्षित**

- **प्रकाशन क्रमांक 3151**

- **प्रकाशक**

ग्लोबल पब्लिकेशन
एल.आय.सी. कॉलनी, लातूर,
ता. जि. लातूर - 413531.

- **अक्षर जुळवणी**

श्री. विकास ढमाले, श्री. अनंत कोटीवाले

- **मुखपृष्ठ**

श्री. विकास ढमाले

- **मुद्रक**

इंडोव्हिजन ऑफसेट प्रिंटींग ॲन्ड बायडिंग,
एल.आय.सी. कॉलनी, लातूर, जि. लातूर

- **प्रथमावृत्ती : 26 जानेवारी 2021**

- **मुल्य 350/-**

# अनुक्रमणिका


| अ.क्र | विवरण | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | संशोधनातील सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अभ्यास<br>**डॉ. सुनंदा रामचंद्र भुसारे** | १ |
| २ | चल : संशोधनातील एक मापदंड<br>**डॉ. अर्चना के देशमुख** | १२ |
| ३ | गृहितक सिध्दांतावर आधारलेले संशोधन<br>**डॉ. एन. आर. हरगळे** | १७ |
| ४ | शैक्षणिक संशोधन काळाची गरज<br>**डॉ. एस. एन. मुंढे** | २४ |
| ५ | मानव्य विद्याशाखेतील संशोधन पध्दतीचे स्वरुप आणि दृष्टीकोन<br>**डॉ. मनिषा बाबूराव गवळी** | ३२ |
| ६ | मानव्यविद्या शाखेतील संशोधन पद्धतीतील माहिती संकलनातील समस्या<br>**डॉ. नविन केशव सोळंके** | ४१ |
| ७ | सामाजिक संशोधन आणि वैज्ञानिक अधिष्ठान पध्दती<br>**डॉ. आर.डी. मुक्टे** | ४८ |
| ८ | उच्च शिक्षणातील संशोधनाचे स्वयं मुल्यमापन<br>**डॉ. सुभाष एन. सातव** | ५३ |
| ९ | संशोधन अहवाल लेखनाचा अभ्यास<br>**डॉ. शालीग्राम गोपाळराव शिंदे** | ५९ |

## प्रकरण ३

# गृहितक सिध्दांतावर आधारलेले संशोधन

**डॉ. एन. आर. हरगुळे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय,
हिंगोली, जि. हिंगोली

संशोधन प्रक्रियेत शास्त्रीय अभ्यास पध्दती अनिवार्य आहे. या शास्त्रीय अभ्यासपध्दतीतील एक महत्त्वपूर्ण पैलू म्हणजे गृहितक होय. यालाच परिकल्पना, अपकल्पना आणि अभ्युपगम असे म्हणतात. उपलब्ध तथ्यांच्या आधारे गृहितकाची चाचणी घेणे हे संशोधनाचे मुख्य कार्य होय. पुर्वीच ज्ञात असलेल्या माहितीच्या आधारे किंवा संशोधनामधून संकलित केल्या जाणाऱ्या तथ्यांच्या आधारे याच गृहितकाची चाचणी घेण्याचा संशोधनकर्ता प्रयत्न करीत असतो. अप्रकटपणे का होईना पण अशा गृहितकाची मांडणी केल्याखेरीज संशोधनकार्य पुढे सरकणेच कठीण असते. कारण गृहितकृत्ये ही संशोधनकार्यास निश्चित दिशा दाखविण्याचे कार्य करीत असतात. सर्वसाधारणपणे एखाद्या विंधानाचे वा दृष्टिकोनाचे खंडण किंवा मंडन होऊ शकेल असा दृष्टिकोन किंवा विधान म्हणजेच गृहितकृत्य होय, तथापि असे असतानाही अनेक विषयाचे अभ्यासक गृहितकाला फारसे महत्त्व देताना दिसत नाहीत असे दिसून येते.


संशोधक विद्यार्थ्यास पूर्ण संशोधन प्रक्रिया आणि या प्रक्रियेत गृहितकृत्याची भूमिका या विषयाची कल्पना स्पष्ट व्हावी व शास्त्रीय पध्दतीने आणि दृढतेने संशोधन व्हावे हा हेतू लक्षात ठेऊन यु.जी.सी. अंतर्गत सर्व विद्यापीठांनी कोर्स वर्क हा अभ्यासक्रम ठेवलेला आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या संशोधक विद्यार्थ्याच्या पीएच.डी. प्रबंध सादरीकरण पूर्व चर्चासत्रात तसेच अंतिम आराखड्यात (Final Syniopsis) फारशा चूका होण्याचा संभव नसतो. अन्यथा, ज्या संशोधक विद्यार्थ्याने ही प्रक्रिया न समजता संशोधन

48

केलेले असते तेव्हा अंतिम टप्यात या चूका चर्चासत्रामध्ये निदर्शनास येतात व त्यात अनेक बदल करण्याचे सूचविले जाते.


शास्त्रीय संशोधन पध्दतीवर अनेक अभ्यासपूर्ण ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यात गृहितकावर महत्त्वपूर्ण चर्चा केलेली असते. तथापि, अनेक वेळेस त्यात फक्त व्याख्या दिलेल्या असतात. उदा. दिलेले नसते तेव्हा संशोधक विद्यार्थ्याला त्याच्या संशोधन विषयाला अभिप्रेत असे गृहितक मांडता आले पाहिजे. तसेच संशोधन प्रक्रियेत संशोधन विषय, संशोधन समस्या, उद्दिष्ट्ये आणि गृहितक यांची योग्य सांगड किंवा मांडणी जमली तर संशोधनाला निश्चित दिशा मिळते.

आपल्या विषयात विषयांतर होऊ नये यासाठी संशोधक विद्यार्थ्याला संशोधन विषय, समस्या, उद्दिष्ट्ये आणि गृहितकाभोवती पूर्ण संशोधन प्रक्रियेत फिरावे लागते. पूढील आकृतीवरून हे अधिक स्पष्ट होऊ शकेल.





सर्वसाधारणपणे संशोधन ही एक दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे कोणतेही संशोधन हे शास्त्रीय पध्दतीद्वारेच केले जाते. संशोधनाच्या दीर्घकालीन प्रक्रियेचा विचार करताना शास्त्रीय पध्दतीच्या क्रमबध्द पायज्यांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. सर्वच सामाजिक शास्त्राच्या विषयाला लागू पडेल अशा वैज्ञानिक पध्दतीच्या सर्वसामान्य पायज्या पुढील प्रमाणे मांडता येतील.

49




संशोधक विद्यार्थ्याच्या संशोधनात वरीलप्रमाणे संशोधन करत असताना इतर काही महत्त्वपूर्ण पैलूकडेही लक्ष देणे महत्त्वाचे असते ज्यात साधनचिकित्सा, संशोधन पध्दती, संशोधनातील नाविण्य, संशोधनाचे महत्त्व याच समावेश होईल. याशिवाय संशोधकाला संशोधनाअंती केलेल्या शिफारशी मांडता येतील.

संशोधकाने नेमके कोणत्या पैलूंकडे लक्ष द्यावे, कशा पध्दतीने मार्गक्रमण करावे, कोणत्या बाबींवर प्रकाशझोत टाकावा हे पुढील आकृतीद्वारे स्पष्ट होऊ शकेल.



वरील सर्व पैलूंचा विचार करताना गृहितकाची चाचणी घेणे अपरिहार्य ठरते तेव्हा संशोधकाला गृहित मांडणी कशी करायची हे तेवढेच महत्त्वाचे असते.

अनेक अभ्यासकांनी गृहितकाची व्याख्या स्पष्ट केली आहे. या व्याख्यांमधून विविधता पहायला मिळते. संशोधक विद्यार्थ्याला या व्याख्यांचा अर्थ अधिक स्पष्ट झाला तर गृहितकाची निर्मिती त्याला योग्य प्रकारे करता येईल.

सी.टी. कुरियन यांच्या मते, "विषयातील घटनेचे संभाव्य स्पष्टीकरण म्हणजेच गृहितक होय."[१]

या व्याख्येत अपेक्षित आहे की, संशोधकाला सर्वप्रथम संबंधित विषयाचे थोडे फार पूर्वज्ञान असणे आवश्यक आहे, तरच त्याला गृहितकाद्वारे संभाव्य विधान मांडता येईल. संशोधक विद्यार्थ्यास विषयाचे संबंधित ज्ञान नसेल, वैचारिक गुंतागुंत असेल किंवा पूर्णपणे मार्गदर्शकावर अवलंबून राहणे असेल तर त्याची संशोधन क्षमता विकसीत होण्यास विलंब होऊ शकतो किंवा तसे न होता त्याचे ढिसाळ संशोधन होत राहते.

पी.व्ही. यंग म्हणतात, "गृहितक हे वैज्ञानिक पध्दतीची पहिली पायरी आहे. गृहितकृत्याची निर्मिती वैज्ञानिक संशोधनाचे अंतिम उद्दिष्ट्य नाही. अध्ययनाचा विषय सत्य आहे हे सिध्द करण्यासाठी संशोधन कार्यात गृहितक निर्माण केले जात नाहीत. वैज्ञानिक संशोधनाचे अंतिम उद्दिष्ट्य सत्याचा शोध घेणे हे आहे."[२]

पी.व्ही. यंग यांच्या मताशी सहमत असलेले अभ्यासक गूड आणि हॅट यांचे अभ्यासनीय विवेचन काही प्रमाणात असेच दिसून येते.[३] त्यांच्या मते गृहितकाद्वारे सत्य असत्याचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते.

जेव्हा सामान्य ज्ञानावर आधारित गृहितक असत तेव्हा या संबंधी सामान्य माहिती पूर्वीपासूनच उपलब्ध असते तथापि ही गृहितके सामान्य माणसालाही उलगडत असली तरी वैज्ञानिक दृष्टिने ती बरोबर आहेत किंवा नाहीत त्यांची सत्यता संशोधनाद्वारे वैज्ञानिक पध्दतीने पाहणे अपेक्षित आहे. गृहितक जर संशोधनातून असत्य ठरले असतील तर केलेले संशोधन हे निरर्थक ठरले असे होत नाही. गृहितक होकारार्थी किंवा नकारार्थी ठरत असले तर दोन्ही वेळेस संशोधनाचे महत्त्व तितकेच असते.

उदा. मंगळ गृहावर जीवसृष्टी असली पाहिजे . . . . . गृहितक.

संशोधकाच्या संशोधनाअंती असे आढळून आले आहे की, मंगळावर जीवसृष्टी नाही तेव्हा संशोधन योग्य दिशेने झाले आणि सत्य असत्य समजले हे महत्त्वाचे. अनेक वेळेस विद्यार्थी आपल्या संशोधनात सामान्य विधान मांडतो आणि गृहितक म्हणून संबोधतो.

उदा. शाहू महाराजांनी अनेक लोकोपयोगी कार्य केले.

(विषय : समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास).

अशा प्रकारचे गृहितक म्हणजे विद्यार्थ्याचे निरीक्षण होय. यात बुध्दीला चालना देणारे संशोधन किंवा वैचारिक गुंतागुंत सोडवायची नसते तेव्हा सर्वसामान्यपणे या निरीक्षणाला धरुन केलेले लिखान म्हणजे पूर्णपणे माहितीचे सादरीकरण ठरेल यात संशोधनात्मक दृष्टि दिसून येणार नाही हे महत्त्वाचे.

गृहितक हे असेही असू नये की, ज्यातून केवळ निबंध तयार होईल व संशोधनात्मक लिखान न होता ते वर्णन ठरेल.

उदा. तुकडोजी महाराज हे अंध्दश्रध्देविरोधी होते.

किंवा

तुकाराम महाराज हे विद्रोही संत होते.

(विषय : इतिहास, समाजशास्त्र).

वरील विधान पाहता तत्कालीन किंवा बहुतांश संत हे सामाजिक रूढी, परंपरा, अंधश्रध्दा यावर आघात करणाऱ्या विचारांचे होते. तेव्हा संशोधक विद्यार्थ्याला अशा गृहितकास धरुन नाविण्यपूर्ण पैलू आपल्या संशोधनातून प्रकाशात आणण्याचे कार्य राहत नाही आणि सर्वसाधारणपणे केलेले संशोधन हे निबंधात्मक होते.

असेही विधान गृहितक म्हणून घेता येणार नाही जे की अगदीच सामान्य आहे आणि त्याला तार्किक आधार नाही किंवा सैध्दांतिक पाठबळ देता येणार नाही.

उदा.

संशोधन विषय : ग्रामीण भागातील महाविद्यालयीन खेळ व क्रीडा क्षेत्राची परिस्थिती.

(विषय : शारीरिक शिक्षण) गृहितक : ग्रामीण भागातील परिस्थिती

क्रिडा क्षेत्रासाठी पोषक नाही.

सर्वसाधारणपणे वरिल माहिती सर्वांनाच माहित असते यात कोणत्याही प्रकारची समस्या, वैचारिक गुंतागूंत दिसून येत नाही. तथापि संशोधक विद्यार्थ्याला अशा गृहितकावर संशोधन करण्यासाठी वेळ, श्रम, पैसा यांचा अपव्यय मात्र करावा लागतो. यातून नाविन्यपूर्ण काही ही हाती लागत नाही.

गृहितक कसे असावे या संबंधी विचार करतांना, संशोधनाला चालना देणारे गृहितक असावे लागते. गृहितक ठरविताना जर त्यामध्ये दोन पैलूंचा सहसंबंध असेल तर अशा प्रकारचे गृहितक हे पूर्ण संशोधनात प्रभावी कार्य पार पाडू शकते.

उदा. खाजगी शिक्षणाची गुणवत्ता अधिक दर्जेदार आहे.

(गृहितक : समाजशास्त्र, लोकप्रशासन, अर्थशास्त्र इ.).

अशा प्रकारच्या गृहितकाची मांडणी दोन पैलूंचा सहसंबंध दाखविणारी पुढीलप्रमाणे असू शकेल.

उदा. जिल्हा परिषद शाळांपेक्षा खाजगी शाळा अधिक दर्जेदार शिक्षण देतात.

इथे संशोधकाला दोन पैलूतील सहसंबंध स्पष्ट करावयाच्या असतो. अर्थातच हे गृहितक संशोधनावर प्रभाव पाडू शकते.

उदा. स्त्री भ्रूण हत्या एक गंभीर समस्या आहे.

(गृहितक : तत्वज्ञान, समाजशास्त्र).

वरील गृहितकात दोन पैलूंचा संबंध दाखविल्यास संशोधनास चालना मिळेल.

उदा. स्त्रीभ्रूण हत्या एक सामाजिक आणि नैतिक समस्या आहे.

संशोधक विद्यार्थ्यास आपले गृहितक अधिकाधिक प्रभावीपणे कसे मांडता येईल याकडे लक्ष देणे तेवढेच महत्त्वाचे असते.

थोडक्यात, प्रभावी गृहितकाची मांडणी ही संशोधनास चालना देते, संशोधन अधिक प्रभावी करते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संशोधनाला दिशा देण्याचे कार्य होते व संशोधन दर्जेदार होते. संशोधन विषय, गृहितक आणि उद्दिष्ट्ये यांची मांडणी संशोधकाने पध्दतशीर केल्यास व यांची सांगड घातल्यास विद्यार्थी संशोधनात भरकटत नाही, विषयांतर होत नाही. तसेच काही प्रमाणात वेळ, श्रम, पैसा यांचा अपव्यय टळतो तेव्हा संशोधनात गृहितक हे दिशादर्शकाची

भूमिका बजावतात. जर संशोधकाने संशोधनात गृहितकाला फारसे महत्त्व दिले नसेल तर ते संशोधन निरर्थक ठरण्याची जास्त शक्यता असते. म्हणून गृहितक हे विचारांती विविध अभ्यासकांशी चर्चा व विवाद करुन निश्चित करणे उचित ठरते.

## संदर्भ सूची :-


१) कऱ्हाडे बी.एम., शास्त्रीय संशोधन पध्दती, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, २००७, पृ.९७.

२) कऱ्हाडे बी.एम., उपरोक्त.

३) William J. Goode, Paul K. Hatt, Methods in Social Research, M.C. Graw Hill, International Editions, Sociology Series ISBN ०-०७-y ८५२६०-x, P. ५६-७३.

४) भांडारकर पु.ल., सामाजिक संशोधन पध्दती, महाराष्ट्र ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, १९८७, पृ.९४.